**रेग्यु.दिवाणी मुकदमा नं.७४/२०१२ मधील नि.१९१ व १९७खालील**

**आदेश**

१. या दाव्यातील वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींचे विरुध्द दावा मिळकती संबंधाने निरंतर ताकीद, वाटप व अन्य दादी मंजुर होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दाव्याचे काम प्रलंबीत असताना या दाव्यातील वादी नं.२ सौ. कोंडाबाई सयाजी दळवी यांचे दि.१/८/२०१८ रोजी मौजे निढळ, ता. खटाव, जि. सातारा येथे निधन झाले आहे. तेंव्हा दाव्यात वादी नं.२चे वारसांना वादी म्हणुन सामील करणे गरजेचे व न्यायाचे आहे. तेंव्हा पुढीलप्रमाणे दुरुस्ती मागितली आहे.

२ श्रीमती कोंडाबाई सयाजी उर्फ सयाप्पा दळवी —मयत वारस

२अ श्री. महादेव सयाजी उर्फ सयाप्पा दळवी वय — ६७ वर्षे,

२ब श्री. तानाजी सयाजी उर्फ सयाप्पा दळवी वय—५५ वर्षे,

२क श्री.बाळु सयाजी उर्फ सयाप्पा दळवी, वय—४८वर्षे,

सर्वांचा धंदा—शेती, सर्व रा.निढळ, ता. खटाव, जि. सातारा.

सदरचे दाव्याचे चौकशीचे काम चालु आहे. वादी क्र.२ ची २अ ते २क ही मुले आहेत. प्रस्तुत दुरुस्ती न्यायाचे दृष्टीने आवश्यक असुन त्यामुळे दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. म्हणुन वादी यांनी सदरचा अर्ज दाव्यात दुरुस्ती करुन मयत वारस म्हणुन रेकॉर्डवर घेणे करीता विनंती केली आहे. सदरचा दुरुस्ती अर्ज दाखल करणेस वादीस ३ महिने २२ दिवसांचा विलंब झालेला आहे. वादी यांना वादी नं.२ याचे मृत्युचा दाखला वेळेत न मिळाल्यामुळे वारस रेकॉर्डवर घेणेस उशिर झालेला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ तर्फे सदरचे अर्जाकामी असे म्हणणे देणेत आले आहे की, वादीचा अर्ज खोटा व लबाडीचा आहे. वादी क्र.२ हे सदर दावा दाखल केल्यापासुन कधीही कोर्टात हजर राहिलेले नाहीत.तसेच सदरचा अर्ज ९० दिवसांचे मुदतीत दाखल केलेला नाही. त्यामुळे सदरचे अर्जास कायदयाची बाधा येते. सदरचा अर्ज दाखल करण्यास वादी यांना तब्बल ३ महिने २२ दिवसांचा विलंब झालेला आहे. सबब वादीचा अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादीचा दावा संपुर्ण वाचला असता प्रस्तुत दाव्याचे काम चालु

असताना वादी क्र.२ हया दि.१/८/२०१८ रोजी निढळ, ता. खटाव जि. सातारा येथे मयत झाल्या आहेत. त्यामुळे सदरील वादी क्र.२ यांना वारस असलेमुळे व दावा मिळकती संबंधाने त्यांचेही हक्क कायम राहात असलेमुळे त्यांना सामील करुन घेणेबाबत वादीने विनंती केली आहे. सदर दुरुस्तीमुळे माझे मते दावा मिळकतीच्या स्वरुपामध्ये बदल होणार नाही. वादी क्र.२ च्या वारसांना वारस म्हणुन सामील होणेसाठी सदरचा अर्ज वादीने दि. २२/२/२०१९ रोजी न्यायालयात केलेला दिसतो. सदरचा अर्ज मुदतीत दिलेला नाही. वादीस वारस रेकॉर्डवर घेणेस ३ महिने २२ दिवसांचा उशिर झालेला आहे. परंतु या वेळेस जर वादीस वारस रेकॉर्डवर आणणेस व तशी दावा दुरुस्ती करण्याची परवानगी दिली तर प्रतिवादींना त्यात कैफियत देण्याची संधी मिळेल. प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. दावा गुणागुणावर निकाल होणेस मदतच होणार आहे. परंतु वादी यांनी ३ महिने २२ दिवसांनी सदर दुरुस्ती मागणी केली आहे. वादींना रु.२००/— विधी सेवा समिती फलटण येथे जमा करणेचे अटीवर विलंब माफ करुन तशी दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायाचे दृष्टीने योग्य होणार आहे. यावरुन खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादींचा नि.१९१ व नि.१९७ वरील अर्ज रक्कम रु.२००/— विधी सेवा समिती कार्यालय फलटण येथे भरणेचे अटीवर मंजुर करणेत येत आहेत.

२. वादींनी १४ दिवसाच्या आत दाव्यात दुरुस्ती करुन दावा दुरुस्ती प्रत दाखल करावी.

३. प्रतिवादीचे वारसांना समन्स काढण्यात यावे.

फलटण
ता.२५/०४/२०१९

(अर्चना ह. ठाकुर)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, फलटण.

सबब वादी यांचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. यावरुन खालील आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. वादींचा नि.१८३ वरील अर्ज विना अट मंजुर करणेत येत आहे.

२. वादींनी १४ दिवसाच्या आत दाव्यात दुरुस्ती करुन दावा दुरुस्ती प्रत दाखल करावी.

३. वादीचे वारसांना समन्स काढण्यात यावे.

फलटण
ता.२३/०१/२०१९

(अर्चना ह. ठाकुर)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, फलटण.